# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ८९-२४** **दिनांक : - १२/०३/२०२४**

## प्रेसनोट

**गुगलवरुन बँकेच्या क्रेडीट कार्ड कस्टमर केअरचा नंबर शोधत असतांना Any Desk हे थर्ड पार्टी स्टाफ्टवेअर डाऊनलोड करण्यास सांगुन तक्रारदार यांची ९३,८४०/- रुपयांची फसवणुक केलेली संपुर्ण रक्कम ९३,८४०/- रुपये हे तक्रारदार यांना परत करण्यात काशिमीरा पोलीस ठाण्यास यश. !!**

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा पोलीस स्टेशन परीसरात राहणा-या श्री. तरुण नंदलाल सिंग, रा. मिरारोड पुर्व,ठाणे हे गुगलवरुन क्रेडीट कार्डचा कस्टमर केअरचा नंबरवर फोन केला असता Any Desk हे थर्ड पार्टी ॲप डाऊनलोड करण्यास सांगुन त्याद्वारे संशयीत यांनी साक्षीदार यांचे खात्यावरुन इलेक्ट्रॉनिक साधनाचा वापर करुन त्यांची ९३,८४०/- रुपयाची फसवणुक झाली होती. सदर फसवणुकीच्या अनुषंगाने काशिमीरा पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नंबर I ६८८/२०२३ भादंवीसं कलम ४२० सह माहिती तंत्रज्ञान अधिनीयमकलम ६६ (सी), ६६(डी) प्रमाणे गुन्ह्यात त्यांना साक्षीदार करुन मा.न्यायालयात अहवाल सादर करण्यात आला होता.

नमूदत तक्रारी बाबत तात्काळ गुन्हा दाखल करुन घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांची रक्कम वेगवेगळया बँक खात्यात वळती झाल्याचे दिसुन आले. त्या अनुषंगाने तक्रारदार यांची रक्कम गोठविण्याबाबत संबंधीत बँकेसोबत पत्रव्यवहार करुन संशयीत खात्यामध्ये रक्कम गोठविण्यात आली. त्यानंतर मा.न्यायालयाकडुन तक्रारदार यांची रक्कम परत मिळविण्या करीता काशिमीरा पोलीस ठाणेचे अधिकारी/अंमलदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा केल्याने तक्रारदार यांची फसवणुक झालेल्या संपुर्ण रक्कम ९३,८४०/- रुपये रक्कम त्यांचे खात्यावर परत मिळविण्यात आली आहे.

अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

- अशा प्रकारे फसवे कॉल अथवा एसएमएस प्राप्त झाल्यास त्यावर कोणत्याही प्रकारे प्रतिसाद देवु नये.
- आपल्या मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणारे एसएमएस, ईमेल, कॉल्स यांची विश्वासहर्ताची पडताळणी करावी.
- आपले मोबाईलवर प्राप्त होणारा OTP किंवा आपली वैयक्तीक माहिती देवु नये.
- तसेच फसवणुक झालेचे लक्षात येताच लागलीच नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा,
- कोणतेही अनाधिकृत ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये अथवा अनोळखी लिंकवर क्लिक करु नये.
- ऑनलाईन फसवणुक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्या सोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त परि ०१, मिरा रोड, श्री. विजय कुमार मराठे, सहा.पोलीस आयुक्त, मिरा रोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक श्री. राहुल सोनवणे, पोलीस उप निरीक्षक वैभव धनावडे, पो हवा/०६२०६ दिनेश आहेर यांनी पार पाडली आहे.

सायबर फसवणुक हेल्प लाईन क्रमांक :- १९३०

सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईहट - www.cybercrime.gov.in

**----0000----**